# प्रकरण चौथे

## समारोप आणि निष्कर्ष

आत्माविष्कार ही सर्वच ललित वाङ्मय प्रकाराची मूळ प्रेरणा आहे. आत्मनिष्ठ किंवा वस्तुनिष्ठ भूमिकेवरून आपले जीवनानुभव व्यक्त करण्याचा ललित लेखक प्रयत्न करीत असतो. आत्मचरित्र या वाङ्मय प्रकारामध्ये तर आत्माविष्कार हीच प्रमुख प्रेरणा असल्याने आणि आत्माविष्कार करताना लेखकाच्या भावना, कल्पना आणि भाषा यांचा आविष्कार होत असल्याने आत्मचरित्र हा एक वाङ्मय प्रकार कसा ठरतो आणि कादंबरी, काव्य यांच्याशी या वाङ्मय प्रकाराचे साम्यभेद कोणते असतात यांची चर्चा पहिल्या प्रकरणात केली आहे. आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार असला तरी कथा, कविता, कादंबरी प्रमाणे तेथे कल्पनाविलासाला स्थान नाही. आत्मचरित्र हा एका व्यक्तीचा, त्या व्यक्तीच्या कालखंडाचा आणि त्या व्यक्तीने ज्या क्षेत्रात कर्तृत्व दाखविले त्या क्षेत्राचा तो इतिहास असतो. म्हणून आत्मचरित्राचे इतिहासाशी साम्य आहे. ललित वाङ्मयातील आत्मनिष्ठा आणि इतिहासातील वस्तुनिष्ठता यांचे आत्मचरित्रात मिश्रण झालेले असते हे पहिल्या प्रकरणात स्पष्ट करून आत्मचरित्राचे स्वरूप कसे असते त्याची वैशिष्टये कोणती आणि त्यामागे कोणकोणत्या प्रेरणा असतात यांचे विश्लेषण केले आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मराठीत आत्मचरित्राची सुरुवात ही आंग्लपूर्व काळात संत व पंडित यांच्या काव्यात, महानुभावाच्या ग्रंथात आढळत असली तरी एक ललित वाङ्‌मय प्रकाराचा विकास आंग्ल काळातच झाला. विविध क्षेत्रातील व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहिली असली तरी कलावंतांच्या आत्मचरित्राचे त्यात वैशिष्टयपूर्ण स्थान असते. कलावंताच्या आत्मचरित्रातून त्या व्यक्तीचे जसे दर्शन घडते त्याचप्रमाणे कलाक्षेत्राचेही दर्शन घडत असते. आपण अभ्यासलेली दोन्ही आत्मचरित्रे 'व्यक्तिदर्शन' आणि 'कलादर्शन' यादृष्टीने वैशिष्टयपूर्ण कशी आहेत हे स्पष्ट केले आहे. आत्मचरित्र लिहिणाऱ्या भालजी आणि सूर्यकांत या कलावंतांच्या कौटुंबिक जीवनाचे, कलाजीवनाचे आणि त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कशी जडणघडण झाली याचा आलेख रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे.

ही दोन्ही आत्मचरित्रे, त्यांचे अंतरंग, व्यक्तीवैशिष्टये आणि त्यांच्या आविष्कार करताना त्यातून दिसून येणारे वाङ्‌मयीन गुण याचे विवेचन प्रकरण दोन आणि प्रकरण तीन मध्ये केले आहे. त्याच्या आधारे काही निष्कर्ष काढावेसे वाटतात ते खालीप्रमाणे -

निष्कर्ष :

१) ही दोन्ही आत्मचरित्रे कलावंतांची असली तरी त्यात फरक आहे. भालजींच्या आत्मचरित्रातून एका दिग्दर्शकाचे दर्शन घडते तर सूर्यकांतांच्या आत्मचरित्रातून एका अभिनेत्याचे

दर्शन घडते. मात्र या दोघांची आपल्या कलेवरची निष्ठा असामान्य आहे. प्रदीर्घ कालखंडात या दोघांनीही असामान्य कलानिष्ठेने त्या त्या क्षेत्रावर आपला ठसा उमटविला आहे.

२) भालजींच्या आत्मचरित्रातून त्यांच्या कौटुंबिक जीवनाची फारशी माहिती कळत नाही. बालपणातील काही अनुभव त्यांनी प्रारंभी कथन केले आहेत. त्यातून बाल भालजींचा स्वभाव दिसून येतो परंतु वैवाहिक जीवनानंतर कौटुंबिक जीवनातील सुखदुःखाचे प्रसंग त्यांनी का सांगितले नाहीत हे कळत नाही. या जीवन कालखंडाविषयी भालजींनी मौन का बाळगले आहे हे कळत नाही. त्यामुळे त्यांच्यातला "माणूस" अनाकलनीय राहिला आहे. आत्मचरित्रात ही एक उणीव वाटते. त्यामानाने सूर्यकांतांच्या आत्मचरित्रात कौटुंबिक जीवनाचे पूर्ण चित्रण आले आहे; बालपणापासून ते एकसष्ठीच्या कार्यक्रमापर्यंत आई-वडील, भाऊ-बहीण, पत्नी-मुले, सासरे-सासू, मेव्हणे आणि मित्र या सर्वांचा त्यांच्या जीवनातील सहभाग; त्या जीवनातील सुखदुःखाचे, मानापमानाचे, यशापयशाचे सुरेख चित्रण केले आहे. त्यामुळे हे आत्मचरित्र

जिवंत वाटते; आकर्षक वाटते. या आत्मचरित्रातील कौटुंबिक गाथा वैशिष्टयपूर्ण वाटते. त्याचबरोबर त्यांच्या कलाजीवनाची घडण कशी घडली आणि एक श्रेष्ठ अभिनेत्याचे स्थान कसे मिळविले याचे केलेले चित्रण अर्थपूर्ण आहे. त्याच्यात एक चढता आलेख आहे. त्यातही एक प्रकारची सुसंगती आहे. व भालजींच्या आत्मचरित्रात तुटक-तुटक घटना सांगितल्याने अशी सुसंगती आढळत नाही.

३) भालजींचे आत्मचरित्र हे त्यांनी स्वतः लिहिले नाही त्यांनी अनुभवाचे कथन केले आणि पुत्र प्रभाकर यांनी इतरांच्याकडून आणि नियतकालीकातून माहिती मिळवून जीवनकथा चित्रित केली आहे आणि त्यातही भालजींना "मी" ही भूमिका आवडत नसल्याने प्रथम पुरुषी निवेदनाऐवजी तृतीय पुरुषी निवेदनात चित्रण केले आहे त्यामुळे हे आत्मचरित्र की चरित्र असा प्रश्न उपस्थित होतो आणि वाटते की हे चित्रण आत्मचरित्रापेक्षा चरित्राकडे अधिक झुकले आहे. आणि तेही कलाक्षेत्रापुरते मर्यादित आहे. त्यामानाने सूर्यकांतांचे आत्मचरित्र हे सरस असून आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराला न्याय देणारे आहे, हे आत्मचरित्र त्यांनी स्वतःच लिहिलेले असल्याने त्यांच्या लेखनात भावसौंदर्य निर्माण झालेले आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

त्यात एक प्रकारची उत्कटताही आहे. भालजींचे आत्मचरित्र भावसौंदर्याच्या बाबतीत, उत्कटतेच्या बाबतीत थोडे कमी पडते.

४) भालजींच्या आत्मचरित्रात वाङ्‌मयीन गुणवत्ताही फारशी आढळत नाही. भाषा, अलंकार, कल्पनाविलास, काव्यमयता इत्यादी गुणांचा आविष्कार दाखविणारी काही वाक्ये यात आहेत. पण ती प्रभाकर पेंढारकर यांची की भालजींची हे कळणे अवघड असल्याने त्याचे श्रेय भालजींना देणे उचित होणार नाही. मात्र वेगवेगळ्या प्रसंगी भालजींनी काढलेले उद्गार, त्या उद्गारात त्यांची भाषा आणि भाव यांचे स्वरूप दिसून येते. तेही परिणामकारक आहे. या पार्श्वभूमीवर सूर्यकांतांच्या आत्मचरित्रात अधिक वाङ्‌मयीन गुणवत्ता आढळते. सूर्यकांतांची भाषा साधी, सरळ असली तरी तिच्यात एक प्रकारचा सहजपणा आहे. ती वाचकांच्या मनाची ठाव घेते. अनेक अर्थपूर्ण विधाने, सुभाषित वजा वाक्ये, नाट्यमय प्रसंग निर्मिती, भावपूर्ण चित्रण, वास्तवाचे कलात्मक चित्रण या गुणांमुळे त्यांची शैली उठून दिसते.

५) कौटुंबिक जीवन चित्रणाच्या बाबतीत दोन्ही आत्मचरित्रात भेद असला तरी कलाजीवनाच्या बाबतीत दोन्ही आत्मचरित्रे

सारखी आहेत. दिग्दर्शनाच्या क्षेत्रातील भालजींचे कर्तृत्व आणि अभिनयाच्या क्षेत्रातील सूर्यकांतांचे कर्तृत्व प्रभावीपणे चित्रित झाले आहे. "साधा माणूस" वाचल्यानंतर एका श्रेष्ठ आणि ध्येयनिष्ठ दिग्दर्शकाची आणि "धाकटी पाती" वाचल्यानंतर एका श्रेष्ठ आणि कर्तृत्ववान अभिनेत्याची प्रतिमा नजरेसमोर उभी राहते.

६) भालजी आणि सूर्यकांत हे एकाच कालखंडातील असून दोघांचाही चित्रपटसृष्टीतील अनुभव प्रदीर्घ आहे. मूकपटापासून ते आजच्या सप्तरंगी बोलपटापर्यंत चित्रपट सृष्टीचा जो विकास झाला आहे. त्या विकासाचे विविध पैलू या दोघांच्याही आत्मचरित्रातून दिसून येतात. या दोघांच्या आत्मचरित्रात मराठी चित्रपट सृष्टीचा विकास आणि इतिहास दिसून येतो. त्यादृष्टीने दोघांच्याही आत्मचरित्रांचे महत्त्व आहे.

७) दोघेही एवढे श्रेष्ठ आणि कर्तृत्ववान पण या दोघांनीही आत्मचरित्राला दिलेली शीर्षके मोठी अर्थपूर्ण असून ती त्यांच्या स्वभावाची द्योतक आहेत असे वाटते. कलाक्षेत्रात "महर्षि" म्हणण्याइतपत भालजींची योग्यता असताना त्यांनी स्वतःच्या आत्मचरित्राला "साधा माणूस" असे शीर्षक दिले आहे. तर त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या आणि अभिनय

क्षेत्रात श्रेष्ठ स्थान मिळविलेल्या सूर्यकातांनी आपल्या आत्म आत्मचरित्राला "धाकटी पाती" असे नाव दिले आहे. एवढे असामान्य कर्तृत्व दाखवूनही दोघे स्वत:कडे "सामान्यपणा" घेतात, छोटेपणा घेतात हा त्यांच्या व्यक्तित्वाचा मोठेपणा आहे.

दोन्ही आत्मचरित्रांचा आणाखी एक विशेष म्हणजे "साधा माणूस" हे गुरूचे आत्मचरित्र तर "धाकटी पाती" हे गुरूच्या शिष्याचे आत्मचरित्र. श्रेष्ठ गुरु आणि श्रेष्ठ शिष्य यांच्या परस्पर संबंधाचे यात चित्रण आढळते. विशेषत: सूर्यकांताच्या आत्मचरित्रात भालजीविषयी व्यक्त केलेली कृतज्ञता ही वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागते.

चित्रसृष्टीतील दोन श्रेष्ठ व्यक्तींची आत्मचरित्रे त्यांच्या या आत्मचरित्राने मराठी आत्मचरित्रात मोलाची भर घातलेली आहे. विशेषत: कलावंतांच्या जीवनावरील आत्मचरित्रांमध्ये या दोन्ही आत्मचरित्रांच्या गौरवाचे उल्लेख करावा लागेल.

— o —